Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

वृत्तपत्रीय निवेदन

# वृक्षरोपे वाटून बँक ऑफ महाराष्ट्रने बँक राष्ट्रीयीकरण दिन साजरा केला

**पुणे दिनांक १९ जुलै २०२१ :** सार्वजनिक क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने दिनांक १९ जुलै २०२१ रोजी पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील वरोती (बुद्रुक) येथे शेतकऱ्यांना वृक्षरोपे वाटप करून बँक राष्ट्रीयीकरण दिन साजरा केला. बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा यांनी वरोती खुर्द, वरोती बुद्रुक व कोळंबी या गावातील १०० शेतकऱ्यांना ५०१ फणसाच्या झाडांचे व कोरोना कीटचे वाटप केले. बँकेच्या नियोजन,विपणन व प्रसिद्धी विभागाचे सरव्यवस्थापक श्री विजय कांबळे, यांनी वेल्हे तालुक्यात फणसाच्या रोपांच्या वाटपाचे महत्व विशद केले. बँकेच्या प्राधान्य कर्ज विभागाचे सरव्यवस्थापक श्री महेंद्र कुमार काबरा, पुणे पूर्व विभागाचे विभागीय व्यवस्थापक श्री विवेक धवन तसेच वरोती खुर्द, वरोती बुद्रुक व कोळंबी या गावाचे सरपंच श्री. रघुनाथ जानकार, उपसरपंच श्री.विलास अन्ना पवार व ग्रामसेवकही श्री.नितिन धुके ही या कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना सांगितले की येणाऱ्या कालावधीत फणसाच्या रोपांची लागवड केल्यास शेतकऱ्यांना शाश्वत शेती व उत्पन्नाचा एक नवा स्त्रोत निर्माण होईल. निवड केलेल्या गावांमधील बहुतांशी लोकसंख्य ही आदिवासी व आर्थिकदृष्ट्या मागास वर्गातील असून भाजीविक्री व बांबू हे त्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधन आहे.

वेल्हे तालुका हा पुणे जिल्ह्यातील अतिशय दुर्गम तालुका समजला जातो आणि परंपरागत शेतीसाठी तेथील भौगोलिक व हवामान विषयक स्थिती अनुकूल नाही. बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्रयत्नांमुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये जागरूकता निर्माण झाली असून त्यांना भविष्यात अशी लागवड करण्यास प्रेरणा मिळेल. त्यामुळे पर्यावरणाच्या शाश्वत संरक्षणाच्या सोबतच शेतकरीस आत्मनिर्भर सुद्धा होण्यास साहाय्य होईल. बँकेच्या महाबँक शेती संशोधन व ग्रामीण विकास न्यासाच्या (MARDEF ) वतीने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.